मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# टाळ मृदुंगाच्या गजरानं आळंदी दुमदुमली

## संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे प्रस्थान : मुख्यमंत्र्यासह हजारो वारकरी विठू नामात तल्लीन

**पिंपरी | प्रतिनिधी**

जगतगुरू संत तुकाराम महाराजांच्या पालखीने पंढरपूरकडे प्रस्थान ठेवलं आहे. ग्यानबा तुकारामाच्या गजरात अवघा मंदिर परिसर दुमदुमून गेला होता. मुख्य मंदिराला प्रदक्षिणा घालताच पालखीचा इनामदार वाड्यात पहिला मुक्काम असेल. तिथं रात्री आरती, मग कीर्तन होईल. लाखोंच्या संख्येने देहूत वारकरी दाखल झाले आहेत.



आळंदीत संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींचा पालखी सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावात पार पडला आहे. माऊलींच्या पालखीच हे १९३ वं वर्ष आहे. इंद्रायणी काठावर लाखो वैष्णवांचा मेळा भरला होता. अवघ्या महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून वारकरी आळंदीत दाखल झाले असून टाळ मृदंगाच्या गजरात ग्यानबा तुकारामाच्या जयघोषात वारकरी तल्लीन झाल्याचं बघायला मिळालं. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे देखील आळंदीत दाखल झाले होते. त्यांनी माऊलींचे दर्शन घेतले.

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना फुगडी खेळण्याचा मोह आवरता आला नाही. एकनाथ शिंदे यांनी केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ आणि खासदार श्रीरंग बारणे यांच्यासोबत फुगडी खेळली. यावेळी बारणे यांनी एकनाथ शिंदे यांना वाकून नमस्कार केला. शिंदे यांनीही बारणेंच्या पाठीवर थाप देत आशीर्वाद दिला.

संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीने पंढरपूरकडे प्रस्थान ठेवले आहे. ग्यानबा तुकारामच्या जयघोषाने अवघी आळंदी दुमदुमून निघाली. पहाटेपासून पालखी सोहळ्याला सुरुवात झाली. मंदिराला आकर्षक फुलांनी सजावट केलेली आहे. वैष्णवांचा महामेरू योगी ज्ञानेश्वर असे फुलांनी मोठ्या अक्षरात मंदिराच्या समोरील बाजूस लिहिलं आहे. वारकऱ्यांची इंद्रायणी नदी काठावर मांदियाळी बघायला मिळाली. पवित्र इंद्रायणी नदीत वारकऱ्यांनी स्नान करून माऊलींच्या प्रस्थान सोहळ्यात सहभागी झाले आहेत. विधिवत पूजा झाल्यानंतर माऊली, माऊलीच्या गजरात संत श्रेष्ठ माऊलींच्या पालखीने पंढरपूरकडे प्रस्थान ठेवले. हा पालखी सोहळा याची देही याची डोळा अनुभवण्यासाठी लाखो वारकऱ्यांनी आळंदीत गर्दी केली होती.

### 'निर्मल वारी'चा संकल्प

**» संस्थान आणि नगरपंचायत यांच्या वतीने यंदाही 'निर्मल वारी'चा संकल्प करण्यात आला आहे. त्यासाठी स्वच्छतेच्या अनुषंगाने पथकांची स्थापना करण्यात आली आहे. जवळपास ५०हून अधिक कर्मचाऱ्यांच्या मदतीने इंद्रायणी नदीघाट, देऊळवाडा या ठिकाणी स्वच्छता केली जात आहे. गावात ठिकठिकाणी एक हजारांहून अधिक स्वच्छतागृहे उभारण्यात आली आहेत. रस्त्यावरील खड्डे बुजवण्यात आले असून, भाविकांसाठी २४ तास पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.**

---

# कर सवलतीसाठी आज शेवटचा दिवस

## नागरिकांच्या सोयीसाठी सुट्टीच्या दिवशीसुद्धा कर संकलन विभागाचे कॅश काउंटर सुरु

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या करसंकलन विभागाने मालमत्ताकरावरील विविध सवलतींचा लाभ घेत तब्बल साडेतीन लाखांहून अधिक करदात्यांनी तब्बल ४०० कोटींहून अधिक कराचा भरणा केला आहे. यामध्ये तीन लाख २५ हजार नागरिकांना आपला चालू आर्थिक वर्षाचा मालमत्ताकर भरून थकीत कराचासुद्धा भरणा केला आहे. करसंकलन विभागाने आवाहन केल्यानुसार, नागरिकांनी ऑनलाइन पद्धतीने कर भरून तब्बल २८५ कोटींचा ऑनलाइन पद्धतीने कर भरला आहे. आता मालमत्ताकरावरील सवलतींचे अवघे दोनच दिवस बाकी असून नागरिकांनी मालमत्ताकरावरील सवलतींचा लाभ घ्यावा, असे आवाहन करसंकलन विभागाचे सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांनी केले आहे.




### अशा आहेत सवलती..

३० जूनपूर्वी मालमत्ताकराची रक्कम ऑनलाइन स्वरूपात भरल्यास १० टक्के

फक्त महिलांच्या नावे असलेल्या एका निवासी मालमत्तेच्या सामान्य करावर ३० टक्के

पर्यावरणपूरक इमारती/ सोसायट्यांसाठी,

- कंपोस्टिंग यंत्रणा, एसटीपी प्लांट, झिरो वेस्ट, रेन वॉटर हार्वेस्टिंग, सौरऊर्जा संकल्पना राबविणाऱ्या इमारतींमधील निवासी मालमत्तांना ५ ते १० टक्के

- ग्रीन बिल्डिंग रेटिंगमध्ये ३ ते ५ रेटिंग असणाऱ्या मालमत्तांना ५ ते १५ टक्के

दिव्यांग व्यक्तींच्या नावे असलेल्या मालमत्तेस ५० टक्के

स्वातंत्र्यसैनिक किंवा त्यांच्या पत्नी यांच्या एका निवासी घरास ५० टक्के

इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग स्टेशन उभारले असणाऱ्या मालमत्तेस २ टक्के

संरक्षण दलातील शौर्यपदक धारक आणि माजी सैनिकांना मालमत्ताकरात १०० टक्के

### सुट्टीच्या दिवशीसुद्धा कॅश काउंटर आहेत सुरू..

**» मालमत्ताकरावरील सवलतींचा शनिवार, २९ जून व रविवार, ३० जून रोजी सुट्टीच्या दिवशीसुद्धा कॅश काउंटर सुरू ठेवण्यात आले आहेत. सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.०० पर्यंत कॅश काउंटर सुरू असणार आहेत. नागरिकांनी मालमत्ताकरावरील सवलतींची संधी चुकवू नये, असे आवाहन करसंकलन विभागाकडून करण्यात आले आहे.**

"पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने जाहीर केलेल्या घसघशीत सवलतींचा शहरातील साडेतीन लाखांहून अधिक करदात्यांनी लाभ घेतला आहे. ज्या नागरिकांना अद्याप मालमत्ताकराचा भरणा केला नाही, अशांसाठी सवलतींचे दोनच दिवस बाकी आहेत. त्यासोबतच सुट्टीच्या दिवशीसुद्धा नागरिकांच्या सोयीसाठी कॅश काउंटरसुद्धा सुरू आहेत. नागरिकांनी त्वरित कर भरून सवलतींचा लाभ घेऊन शहराच्या विकासामध्ये हातभार लावावा.

**- नीलेश देशमुख, सहाय्यक आयुक्त, कर आकारणी व कर संकलन विभाग, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.**

# पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी महापालिका सज्ज

## संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्याचे शहरात रविवारी आगमन

**पुणे | प्रतिनिधी**

दरवर्षीप्रमाणे यंदाही संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्याचे शहरात रविवारी (दि. ३०) आगमन होणार आहे. पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी पुणे महापालिकेने जय्यत तयारी केली आहे.

श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे आगमन आळंदी रस्त्यावरील सयाजीराव कुसमाडे संकुल (करसंकलन कार्यालय), कळस क्षेत्रीय कार्यालय, आळंदी रस्ता येथे दुपारी १२.३० वाजता आगमन झाल्यानंतर प्रशासक तथा महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले पालखीचे दर्शन घेऊन स्वागत करणार आहेत. तसेच श्री संत तुकाराम महाराज पालखीचे मुंबई पुणे रस्त्यावरील बोपोडी सिग्नल चौक येथे दुपारी १.३० वाजता आगमन झाल्यानंतर प्रशासक तथा महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले पालखीचे दर्शन घेऊन स्वागत करणार आहेत. दुपारी चार वाजता मुंबई पुणे रस्त्यावरील नाबार्ड बँकेसमोर पाटील इस्टेट वसाहतीशेजारी येथे दोन्हीही पालख्यांचे दर्शन घेऊन स्वागत करणार आहेत. तसेच मंगळवारी (२ जुलै) सकाळी ९.०० वाजता हडपसर गाडीतळाजवळ, हडपसर येथून दोन्हीही पालख्यांचे श्री क्षेत्र पंढरपूरकडे प्रस्थानावेळी आयुक्त डॉ. भोसले पुणे मनपाचे वतीने निरोप देणार आहेत.



पालखी आगमनापासून ते प्रस्थानापर्यंत रफी महंमद किडभाई शाळा, भवानी पेठ व मामासाहेब बडदे दवाखाना, नाना पेठ येथे प्राथमिक उपचारासाठी २४ तास दवाखाने कार्यरत ठेवण्यात येऊन वारकऱ्यांना मोफत उपचार करण्यात येतील. पुणे जिल्ह्यातील शासकीय व खासगी रुग्णालयातील १० टक्के बेड्स (खाटा) आरक्षित ठेवणेबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच दवाखाने, प्रसूतिगृह/ रुग्णालये येथे मोफत तपासणी व उपचार दिले जाणार आहेत. दरवर्षीप्रमाणे या वर्षीही पुणे मनपाचे वैद्यकीय पथक पुणे ते पंढरपूर मुक्कामापर्यंत पाठविण्यात येणार आहे. कीटकनाशक विभागामार्फत पालखी मार्ग, सर्व दिंड्यांच्या विसाव्याच्या ठिकाणी औषध फवारणी करण्यात येणार आहे. तसेच पशुवैद्यकीय विभागामार्फत पुणे मनपा हद्दीतील भटक्या व मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यात येणार आहे.

**घनकचरा व्यवस्थापन विभाग :**

महापालिकेच्या १५ क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत सर्व सार्वजनिक रस्त्याचे झाडझूड, क्रॉनिक स्पॉटची स्वच्छता व जमा होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचे नियोजन सर्व क्षेत्रीय कार्यालयाकडून करण्यात आले आहे. संपूर्ण शहरात दिवसातून तीन वेळा सार्वजनिक स्वच्छतेचे कामकाज करण्यात येणार आहे. भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत स्वच्छता विषयक कामकाज करण्यासाठी अंदाजे एकूण ३५० पुरुष सफाई सेवक व २५० महिला सफाई सेविका असे एकूण ६०० सफाई सेवक कार्यरत आहेत. १५ क्षेत्रीय कार्यालयामध्ये एकूण अंदाजे १६९० पोर्टेबल व फिरते शौचालयाची सोय करण्यात आलेली असून दिवसातून तीन वेळा स्वच्छता करण्यात येणार आहे. सर्व क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत महिला वारकऱ्यांसाठी आवश्यकतेनुसार मनपा शाळेत व खासगी शाळेत मुक्कामाच्या ठिकाणी शौचालय व महिलांसाठी न्हाणी घराची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच सार्वजनिक रस्त्यावर व वारकरी मुक्कामी असलेल्या ठिकाणी स्वच्छता राहण्याच्या दृष्टीने घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून २,६२५ लिटर जर्मीक्लीन, ३७,५०० किलो कार्बोलिक पावडर व ११,२५० किलो हर्बल वेस्टस्ट्रीट पावडर इत्यादी पुरविण्यात येणार आहे. महिला वारकऱ्यांसाठी ५०,००० सॅनिटरी नॅपकिन्सचे मोफत वाटप करण्यात येणार आहे.

### महापालिका देणार या सुविधा

» **आरोग्य विभाग : पालखी सोहळ्यामध्ये सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून घेतली जाणार आहे. त्यासाठी फिरत्या दवाखान्यांद्वारे मोफत आरोग्यसेवा पुरविली जाणार आहे. रविवारी मनपाचे वैद्यकीय पथक (जुना फिरता दवाखाना) वैद्यकीय अधिकारी, फार्मासिस्ट, नर्स, नर्सिंग ऑर्डर्ली व प्रथमोपचारासह पुणे-मुंबई रस्त्यावरील फुले नगर (विश्रांतवाडी), पुणे-मुंबई रस्त्यावरील पाटील इस्टेट वाकडेवाडी, साखळपीर तालीम येथे उपस्थित राहील. पालखीसोबत रफी महंमद किडभाई शाळा, भवानी पेठ पोलीस चौकीसमोर, रामोशी गेटपर्यंत राहील. व दर्शनाला येणाऱ्या वारकऱ्यांसाठी/ भाविकांसाठी मोफत उपचार करण्यात येतील.**

# पुणे विमानतळाच्या नवीन टर्मिनलला अखेर मुहूर्त

## सीआयएसएफच्या मनुष्यबळाची केंद्रीय गृहविभागाकडून पूर्तता : केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या प्रयत्नांना मोठे यश

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर नव्याने साकारलेले टर्मिनल लवकरच पुणेकरांसाठी खुले होण्याचा मार्ग आता मोकळा झाला असून टर्मिनलच्या सुरक्षेसाठी आवश्यक असणारे केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाचे (सीआयएसएफ ) मनुष्यबळ केंद्रीय गृह विभागाकडून मंजूर करण्यात आले आहे. केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी यासंदर्भात नुकतीच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली होती.

पुणे विमानतळावरुन होणाऱ्या उड्डाणांची गरज लक्षात घेत नवे टर्मिनल साकारले होते. गेल्या काही महिन्यांपूर्वी त्याचे उद्घाटनही झाले होते. मात्र सीआयएसएफच्या मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे या टर्मिनलचा प्रत्यक्ष वापर सुरु झाला नव्हता. मोहोळ यांनी केंद्रीय राज्यमंत्री पदाचा कार्यभार घेतल्यानंतर लगेचच या प्रकरणी लक्ष घालून गृह विभागाकडे पाठपुरावा सुरु केला होता. शिवाय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेऊन चर्चाही केली होती. या प्रयत्नांना यश आले आहे.



याबाबत माहिती देताना मंत्री मोहोळ म्हणाले, नवे टर्मिनल लवकरात लवकर वापरात आणण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना यश आले असून पुणे विमानतळासाठी २२२ विविध पदांना मंजुरी मिळाली आहे. ही पदे वेगवेगळ्या ७ प्रकारांची आहेत. या नव्या संख्येसह पुणे विमानतळासाठी आता सीआयएसएफच्या मनुष्यबळाची संख्या ७१५ वर गेली आहे. नव्या टर्मिनलसाठी आवश्यक असणारी संख्या आता पूर्ण झाली असून नवे टर्मिनल वापरात आणण्यात आता कोणताही अडथळा उरलेला नाही. त्यामुळे हे टर्मिनल लवकरात लवकर खुले करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

### पुणे विमानतळाच्या कामांना गती

» **मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याकडे नागरी हवाई वाहतूक विभागाची जबाबदारी आल्यानंतर त्यांनी पुणे विमानतळाच्या प्रश्नांबाबत विशेष लक्ष घातले. याचाच सकारात्मक परिणाम म्हणजे अवघ्या दोन आठवड्यात पुणे विमानतळाचे प्रलंबित प्रश्न मार्गी लागले आहे. यात धावपट्टी वाढवण्यासाठी शक्यता तपासणी सर्वेक्षणला परवानगी मिळाली तसेच पार्किंग बेवर पार्क केलेले विमान संरक्षण दलाच्या जागेत हलवण्यात आले, या दोन्ही विषयांसदर्भात मोहोळ यांनी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची भेट घेतली होती. आणि आता नवे टर्मिनल खुले होण्याचाहीमार्गही मोकळा झाला आहे. या तीनही प्रश्नांचा पाठपुरावा मोहोळ यांनी स्वतः केला होता.**

# प्रदूषणामुळे 'इंद्रायणी'चा श्वास गुदमरला

## इंद्रायणी नदीत जलपर्णी जमून जलचरांचे अस्तित्व संकटात आले आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

इंद्रायणी नदीत अनेक नाल्यांचे पाणी थेट सोडले जात असल्यामुळे नदी अत्यंत प्रदूषित झाली आहे. पालखी सोहळा अवघ्या काही घटकांवर आला असतानादेखील इंद्रायणी नदीच्या प्रदूषणात घट झालेली नाही. त्यातच वारकरी इंद्रायणी नदीत अंघोळ करतात, तेच प्रदूषित पाणी तीर्थ म्हणून प्राशन करतात. हा राजरोसपणे भाविकांच्या आरोग्याशी खेळ सुरू आहे, असे असताना प्रशासन मात्र बघ्याची भूमिका घेत असल्यामुळे नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

मागील काही वर्षांपर्यंत मासे, खेकडे असे जलचर सामावून स्वच्छ, निर्मळ वाहणाऱ्या इंद्रायणीच्या प्रदूषणात दिवसेंदिवस वाढ होत आहे. अलीकडे वाढलेल्या जलप्रदूषणामुळे दरवर्षी इंद्रायणीत लाखो जलचरांना जलसमाधी मिळत आहे. धार्मिक भावनांसह उद्योगांसाठीदेखील वरदान असलेली इंद्रायणी नदी प्रदूषणमुक्त होण्यासाठी टाहो फोडत आहे. पण प्रशासकीय अनास्था, नागरिकांचा हलगर्जीपणा, कारखान्यांमधून निघणारे केमिकलयुक्त पाणी रोखण्यासाठी प्रशासनाची डोळेझाक करत असल्यामुळे इंद्रायणी नदीचा श्वास गुदमरला आहे.

मावळ तालुक्यातील कुरवंडे गावातून इंद्रायणी नदी उगम पावते. पुढे ती देहूगाव, आळंदी मार्गे तुळापूर येथे जाऊन भीमा नदीला मिळते. भीमा नदी पुढे मुळा-मुठा नदीला घेऊन उजनी धरण मार्गे पंढरपूरला जाते. पंढरपूरमध्ये हीच भीमा नदी चंद्रभागा होते. त्यानंतर पुन्हा ती भीमा म्हणून वाहू लागते. ज्ञानोबा माऊली तुकाराम, ज्ञानेश्वर माऊली तुकाराम, देव इंद्रायणी थांबला. पंढरीचा पांडुरंग अळंदीशी आला, भक्तिभावाने एक रूप झाला. म्हणे मुक्ताबाई चमत्कार झाला, समाधी घेता हात थरथरला. एका जनार्दनी इंद्रायणी आठव, उधळुनी निघाले आळंदी हे गाव. अशा अनेक अभंगांमध्ये इंद्रायणीचा उल्लेख आढळतो. देशभरातून लाखो भाविक देहू-आळंदी नगरीत येतात. धार्मिक आस्था जोडली असल्याने अनेकजण इंद्रायणी नदीत अंघोळ करतात. तर, काहीजण तेच पाणी तीर्थ म्हणून प्राशन करतात, असे प्रदूषणयुक्त पाणी प्यायल्याने अनेक गंभीर आजारांना निमंत्रण मिळते.



### लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकाऱ्यांची उदासीनता

» इंद्रायणी नदीच्या काठावर ग्रामपंचायती, नगरपंचायती, नगर परिषद, महापालिका अशा स्थानिक स्वराज्य संस्था आहेत. नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळ आहे. इतर शासकीय यंत्रणा आहेत. पण इंद्रायणी नदीचे प्रदूषण कुणाच्याही नजरेस पडत नाही. राजकीय व्यक्तींची अनास्था, प्रशासकीय यंत्रणेची डोळेझाक, भविष्याबाबत कसलीही चिंता नसलेले कारखानदार आणि दिसत असूनही न दिसल्यासारखे करणारे सर्वसामान्य नागरिक यापैकी कुणीही इंद्रायणीचा आकांत लक्षात घेत नाही, हीच मोठी शोकांतिका आहे.

> इंद्रायणी नदीत सांडपाणी सोडल्यामुळे अनेक प्रकारचे रोग निर्माण झाले आहेत. तेच जल तीर्थ म्हणून प्राशन करता येत नाही. याकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे. वारकऱ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्यामुळे इंद्रायणी नदी प्रदूषणमुक्त करणे गरजेचे आहे.
> - हभप नितीनमहाराज काकडे, संस्थापक, श्री विठ्ठल परिवार

### नदीवर जलपर्णीची चादर

» अनेक गावांची तहान भागवत, शेतशिवार फुलवत इंद्रायणी वाहते. नदी शहरात येताच अनेक गटारी, नाले नदीत थेट मिसळतात. त्यामुळे नदीचा रंग बदलू लागतो. निर्मळ पाण्याला नाल्याचे रूप येते. मोकळी ढाकळी वाहणाऱ्या इंद्रायणीत जलपर्णी दिसू लागते. नदी जशी शहराकडे जाईल तशी दुर्गंधीयुक्त, प्रदूषित पाण्यावर वाढणारी जलपर्णी मोठ्या प्रमाणात दिसू लागते. आळंदीजवळ जाताच नदी इतकी प्रदूषित होते की तिला अक्षरशः फेस येतो. अनेक दिवस हा फेस तसाच राहतो.

### इंद्रायणी सुधार प्रकल्प 577.16 कोटींचा

» इंद्रायणी नदी स्वच्छतेसाठी शासनाने इंद्रायणी सुधार प्रकल्पाचा 577.16 कोटी रुपयांचा सविस्तर प्रकल्प अहवाल ऑगस्ट 2023 मध्ये राज्याच्या पर्यावरण विभागाकडे सादर केला आहे. राज्याने यास मान्यता दिली असून, आता हा अहवाल केंद्राच्या राष्ट्रीय नदीसंवर्धन संचालनालयाकडे (एनआरसीडी) पाठवण्यात आला आहे. यासाठी एनआरसीडीकडून 60 टक्के आणि राज्य शासन 40 टक्के अनुदान देणार आहे. या प्रकल्पांतर्गत इंद्रायणी नदीच्या तीरावर एकूण 48 गावांमधील पाणीप्रक्रिया करून नदीत सोडण्याबाबत नियोजन केले जात आहे.

# ज्ञानोबा-तुकोबा नामात गोडवा वेगळा; रंगला आनंदसोहळा!

## देहूत इंद्रायणी काठ राज्यभरातून वारकरी, भाविककांच्या गर्दीने गजबजला

**पिंपरी | प्रतिनिधी**

हाती पताका... डोईवर तुळशी वृंदावन... डोक्यावर पांढरी टोपी, अंगी पांढरी वस्त्रे, गळ्यात गमछा परिधान करून... सोबती वासुदेव साथ, हाती वीणा, टाळ, मृदुंग आणि मुखी ज्ञानोबा तुकाराम... चा जयघोष, अशा भक्तिमय वातावरणात जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज पालखी प्रस्थान सोहळ्याच्या निमित्ताने शुक्रवारी (दि. २८) देहूनगरी दुमदुमून गेली.

राज्यभरातून वारकरी, भाविक आपल्या शेतांमध्ये पेरण्या करून देहत दाखल झाले होते. त्यांची गर्दी येथे दिवसभर दिसली. अशा या वैष्णवांच्या गर्दीन इंद्रायणी काठ गजबजला, येथे वैष्णवांचा मेळाच भरल्याचे पहायला मिळाले, वारकऱ्यांच्या गर्दीसोबतच अनेक विक्रेत्यांकडून येथे विविध खेळणी, जीवनावश्यक वस्तू, फुगे, पायी वारीसाठी आवश्यक साहित्य विक्रीचे स्टॉल लावण्यात आले होते. त्या स्टॉलवर झालेल्या गर्दीमुळे देहूगावाला जत्रेचे स्वरूप आल्याचे पहायला मिळाले,

वारकरी भाविकांसह राजकीय नेते आणि मराठी मालिकेतील कलाकारांनी देखील हजेरी लावली. स्थानिक आमदार, खासदार पालखी सोहळ्यात दाखल झालेच होते. परंतु, मराठी मालिकांमध्ये काम करणाऱ्या कलाकारांनीही हजेरी लावली होती. स्वामी समर्थ मालिकेत स्वामी समर्थांचा अभिनय करणारे अक्षय मुदवडकर यांच्यासह बाळूमामा मालिकेतील छोट्या बाळूमामांची भूमिका करणारे समर्थ पाटील आणि मोठ्या बाळूमामांची भूमिका करणारे प्रकाश धोत्रे हेही उपस्थित होते.

पवित्र इंद्रायणीत अभ्यंगस्नान शुक्रवारची पहाट होताच, देहूत विसावलेल्या वारकरी भक्तांची पाऊले वर्षानुवर्षे वारकरी परंपरा जपत असलेल्या इंद्रायणीच्या दिशेने वळली. त्यांनी पालखी सोहळ्यातील पायी वारीला सुरुवात करण्यापूर्वी या इंद्रायणीच्या घाटावर अभ्यंगस्नान केले. दिवसभर या इंद्रायणीच्या घाटावर स्नान करणे, तोंड हात-पाय धुणे, आराम करण्यासाठी वारकऱ्यांची गर्दी दिसली.



### वारकऱ्यांची सेवा

» देहूगावात आलेल्या वारकऱ्यांच्या सेवेसाठी देहू गावातील नागरिक सरसावल्याचे पहायला मिळाले.स्थानिक नागरिकांनी वारकऱ्यांसाठी जेवण,अंघोळीसाठी पाणी आणि राहण्याची व्यवस्था केली होती, तर येथील सामाजिक संस्था, गणेश मंडळे, विक्रेत्यांकडून ठिकठिकाणी स्टॉलद्वारे वारकऱ्यांच्या चहा, नाष्टा आणि पिण्याच्या पाणी वाटपाची व्यवस्था केली होती.


# आषाढी वारीत विस्कळित पाणी पुरवठ्याचे विघ्न

## पुणे शहराला खडकवासला धरणातून पाणी पुरवठा होतो, त्याठिकाणी 500 एमएलडी क्षमतेचे जॅकवेल आहे

**पुणे | प्रतिनिधी**

खडकवासला धरणातून पर्वती जलकेंद्रात ३ हजार मिमी व्यासाची दुसऱ्या जलवाहिनीतून ग्रॅव्हिटीतून पाणी पुरवठा केला जातो. आषाढी वारीच्या निमित्ताने लाखो वारकरी पुण्यात विशेषतः मध्यवर्ती पेठांमध्ये दोन दिवस मुक्कामी असताना शहरावर विस्कळित पाणी पुरवठ्याचे विघ्न ओढवले आहे. आज (ता. २९) सकाळी खडकवासला जॅकवेल येथे शॉर्टसर्किट झाल्याने पर्वती जलकेंद्राला होणारा पाणी पुरवठा बंद झाला. त्याचा परिणाम जवळपास संपूर्ण शहरावर झाला. अचानक पाणी न आल्याने नागरिकांची प्रचंड तारांबळ उडाली. तर, वारीच्या पार्श्वभूमीवर महापालिकेने दुरुस्तीचे काम हाती घेतले असून, रात्री बारा पासून पाणी पुरवठा सुरु होईल असे प्रशासनातर्फे सांगण्यात आले आहे.





### 'या' भागातील पाणी पुरवठा विस्कळित

» जॅकवेल बंद पडल्यानंतर अवघ्या काही वेळात सर्व पेठा, बिबवेवाडी, सहकारनगर, मुकुंदनगर, पर्वती, गंगाधाम, एसएनडीटी, गोखलेनगर,कोथरूड, डहाणूकर कॉलनी, चतुःश्रृंगी परिसर, येरवडा, संपूर्ण हडपसर, सोलापूर रस्ता, महंमदवाडी, रेसकोर्स, खराडी, येरवडा, संपूर्ण कात्रज, आंबेगाव, धनकवडी, सुखसागरनगर, केदारेश्वर टाकी येथील पाणी पुरवठा विस्कळित झाला.

पुणे शहराला खडकवासला धरणातून पाणी पुरवठा होतो, त्याठिकाणी ५०० एमएलडी क्षमतेचे जॅकवेल असून, त्यातून मोठ्या जलवाहिनीतून पर्वती जलशुद्धीकरण केंद्रात पाणी पुरवठा केला जातो. पर्वतीमध्ये पाणी शुद्ध केल्यानंतर शहराच्या विविध भागात पाणी वितरण केले जाते. आज सकाळी साडे सहाच्या सुमारास जॅकवेलमधील विद्युत पुरवठा करणाऱ्या २२ केव्ही केंद्रातील कंट्रोल पॅनेल खराब होऊन मोठे शॉटसर्किट झाले. त्यात अनेक उपकरणे जळाल्याने जॅकवेलमधून पर्वती जलकेंद्राकडे पाणी पाठविण्याचे काम बंद पडले. त्यामुळे काही वेळातच शहराच्या बहुतांश भागातील पाणी पुरवठा बंद झाला.

पाणी पुरवठा विभागाला याची माहिती मिळताच दुरुस्तीचे काम सुरु झाले. कंट्रोल पॅनेलमधील उपकरणे बदलण्याचे काम सुरु असून, संध्याकाळी सहा पर्यंत हे काम पूर्ण होईल. त्यानंतर खडकवासला जॅकवेलमधून पर्वती जलकेंद्राला पाणी पुरवठा सुरु होईल. पाणी शुद्धीकरण करण्याची प्रक्रिया पूर्ण करून रात्री १२च्या सुमारास सर्व भागात पाणी पुरवठा सुरु होईल, असे प्रशासनातर्फे सांगण्यात आले आहे.

### पेठांसाठी पर्यायी व्यवस्था

» खडकवासला धरणातून पर्वती जलकेंद्रात ३ हजार मिमी व्यासाची दुसऱ्या जलवाहिनीतून ग्रॅव्हिटीतून पाणी पुरवठा केला जातो. आषाढी वारी शहरात येत असताना पालखी मार्ग आणि पेठांमधील पाणी पुरवठा विस्कळित होऊ नये यासाठी या जलवाहिनीतून प्राधान्याने पेठांना पाणी पुरवठा करण्यासाठी प्रयत्न सुरु केले आहेत. दुपारी चार नंतर पेठांमधील पाणी पुरवठा सुरु होईल, असे नंदकिशोर जगताप यांनी सांगितले.

“ खडकवासला जॅकवेल येथे सकाळी साडेसहाच्या सुमारास शॉर्टसर्किटमुळे पाणी पुरवठा यंत्रणा बंद पडली. त्यामुळे शहराच्या विविध भागातील पाणी पुरवठा विस्कळित झाला आहे. पण युद्धपातळीवर दुरुस्तीचे काम सुरु असून, आज रात्री १२पर्यंत पाणी पुरवठा सुरु होईल. त्यामुळे आषाढी वारीसाठी आलेल्या वारकऱ्यांची गैरसोय होणार नाही. आमची यंत्रणा सतर्क आहे.

- नंदकिशोर जगताप, प्रमुख, पाणी पुरवठा विभाग

# ‘चौकशी होईपर्यंत संस्थेवर प्रशासक नेमावा’: आप्पासाहेब जगदाळे

## शालेय पोषण आहार योजनेमध्ये झालेल्या अपहाराची चौकशी झालेला अहवाल व कार्यवाहीची अंमल बजावणी करावी

**पुणे | प्रतिनिधी**

इंदापूर शहरातील श्री नारायणदास रामदास हायस्कूल व जुनियर कॉलेज येथील शालेय पोषण आहार योजनेमध्ये झालेल्या अपहाराची चौकशी झालेला अहवाल व कार्यवाहीची अंमल बजावणी करावी व संबंधीतांवर कडक कारवाई करा.

तसेच चौकशी होईपर्यंत संस्थेवर प्रशासक नेमावा अशी मागणी इंदापूर तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती व जिल्हा बँकेचे संचालक आप्पासाहेब जगदाळे तसेच इंदापूर नगर परिषदेचे माजी उपनगराध्यक्ष भरत शहा यांनी लेखी निवेदनाद्वारे इंदापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्याकडे शुक्रवार (ता.28 जून) रोजी केलेली आहे.

यासंदर्भात दिलेल्या लेखी निवेदनात असे म्हटले आहे की, पुणे जिल्हा परिषदेचे प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी यांनी मुख्याध्यापक



नारायनदास रामदास हायस्कूल व ज्यु. कॉलेज,इंदापूर यांना शापोआ योजना वसुली बाबतचे पत्र (ता. ३१.मे) रोजी पाठवले आहे. तरी देखील ठोस कारवाई होत नाही.

यामध्ये श्री. नारायणदास रामदास हायस्कूल व ज्यु. कॉलेज येथील कथीत शालेय पोषण आहार योजने अंतर्गत विद्यार्थ्यांना देण्यात येणारा आहार यामध्ये संबंधीत मुख्याध्यापक आणि इतर यांनी अपहार केला आहे. असे चौकशी अहवालावरून सिध्द झाले असून त्यांना रक्कम शासन खाती जमा करण्याचे आदेश दिलेले असताना त्यावर अद्याप काही कारवाही झालेली दिसत नाही.

१९३८ सालापासून इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ, इंदापूर यांचे मार्फत हजारो, गोरगरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे पवित्र कार्य करीत असतानाच, हल्ली अशा घटना घडणे ही शोकांतीका आहे.

शालेय पोषण आहार योजनेमध्ये अपहार होणे हेच मुळात तालुक्यातील या संस्थेमध्ये शिकणाऱ्या गोर गरीब विद्यर्थ्यांवर अन्याय केल्यासारखे आहे. शासन विविध योजनांद्वारे शिक्षण तळागाळात पोहचवण्याचे काम करत असतानाच सोरटे यासारखे मुख्याध्यापक आणि त्यांचे भ्रष्ट सहकरी त्यामध्ये पदाचा गैरवापर करत अडथळा आणताना दिसत आहेत.

मुख्याध्यापक ह्यांच्या बद्दल बऱ्याच पालकांची तक्रार असल्याचे समजते नुकत्याच चालू असलेल्या शालेय ॲडमिशन संदर्भात अत्यंत मुजोरीने बोलणे मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या प्रवेश संदर्भात आगाऊची प्रवेश शुल्काची मागणी करणे बंगल्यावर जाऊन भेटा म्हणजे त्यांनी सांगितल्यास प्रवेश होईल या सारख्या बऱ्याच तक्रारी पालक बोलून दाखवत आहेत. ही संस्था प्रायव्हेट लि.असल्यासारखा कारभार सद्या चालू आहे. इतके सर्व होत असताना संस्थेमध्ये हा जो अनागोंदी कारभार हे मुख्याध्यापक करत असताना, संस्थाचालक म्हणून अध्यक्ष आणि त्यांचे संचालक मंडळ हे जाणिवपूर्वक याकडे कानाडोळा करत आहेत. म्हणून हे प्रकरण हे विद्यार्थ्यांच्या भविष्याबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण करत आहे.

### “खासदार सुप्रिया सुळे यांना पाठवले निवेदन “

» राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्षाचे नेते आप्पासाहेब जगदाळे व भरत शहा यांनी संबंधित प्रश्नावर,ठोस कार्यवाही होण्यासाठी खासदार सुप्रिया सुळे यांच्याकडे यासंदर्भात तक्रार पाठवलेली आहे. त्यामुळे संसदेत हा प्रश्न गाजणार हे मात्र नक्की.